रक्तदान जीवनदान

महाराष्ट्र शासन

# श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे

(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्क हॉटेलसमोर, धुळे

ई मेल: deangmcdhule@gmail.com वेबसाईट: www.sbhgmcdhule.org दुरध्वनी क्र:-०२५६२-२३९४०७/२३९४०८

श्रीभाहिशावैमधु /आस्था-२/सहा.प्राध्या./कंत्राटी ता.नि.३६४ दिवस/ 11990-95 /२०२५ दि:- 09 /१२/२०२५

## " जाहीरात "

विषय:- सहाय्यक प्राध्यापक रिक्तपदे कंत्राटी (मानधन) तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार भरणेबाबत.

संदर्भ:- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक : एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/ वैसवा-३, मंत्रालय, मुंबई दि.१८ जुलै, २०२४.

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, सहायक प्राध्यापक गट-ब या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरती नियुक्तीचे अधिकार संस्थास्तरवर संबंधित अधिष्ठाता यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या त्रृटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा सतत अबाधित सुरु असावी या दृष्टीने अधिष्ठाता, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे या संस्थेतील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता किंवा मा.शासन/संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत बंधपत्रित उमेदवार, महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत, शासन निवड मंडळ, सरळसेवेने नियमित अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थास्तरावरील स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या ठोक मानधन व गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि.०९/१२/२०२५ ते दि.१६/०१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) |
| २. | मुलाखतीचा दिनांक | दि. १७/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता.<br>तसेच दर बुधवारी/गुरुरवारी |
| ३. | मुलाखतीचे ठिकाण | मा.अधिष्ठाता, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांच्या दालनात. |

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेत स्थळावर ( **WWW.deangmcdhule.org** ) प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीमधील दर्शविण्यात आलेला विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Download) करुन घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपूर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात. उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन कार्यालयातील आवक-जावक शाखेस आपला अर्ज सादर करावा. अर्ज सादर केल्या बाबतची पोच घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये. ऑनलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह व साक्षांकित केलेल्या



Scanned with OKEN Scanner

प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार केला जाणार नाही.

* Required Educational Qualification As per N.N.C. Norms.

| Sr. No. | Name of Subject & Name of Post | Vacant post | Required Educational Qualification | Experience |
|---|---|---|---|---|
| १ | शरीराचनाशास्त्र Assistant Professor (Anatomy) | ०५ | M.S. (Anatomy)/M.D.Anatomy/MBBS with M.Sc. (Anatomy)/M.Sc.(Medical Anatomy) with Ph.D. (Medical Anatomy)/ M.Sc. Medical Anatomy with D.Sc.Medical Anatomy/DNB | *१) One year as Senior Resident in the concerned subject in a recognized/ permitted medical college after acquiring MD/MS Degree. *२) ३ years Junior Resident in a recognized/ permitted medical college in the concerned subject and one year as Senior Residnet in the concerned subject in a recognized/ Permitted medical college. In case of DNB candidate equated to MD/ MS in terms of clause ४A of Schedule-I, in addition ३ year teaching experience in the subject as Resident/Registrar/Dem onstrtor/ Tutor/or work experience gained during DNB training, one year as Senior Resident in the concerned subject in a recognized/ Permitted medical college. |
| २ | शरीरक्रियाशास्त्र Assistant Professor (Physiology) | ०५ | M.D. (Physiology)/MBBS with M.Sc. (Medical Physiology)/ M.Sc. (Medical Physiology) with Ph.D.Medical Physiology/ M.Sc. Medical Physiology with D.Sc. Medical Physiology/DNB | |
| | Assistant Professor (Biophysics (जीवभौतीक) | ०१ | | |
| ३ | जीवरसायनशास्त्र Assistant Professor (Biochemistry) | ०२ | M.D. (Biochemistry)/MBBS with M.Sc. (Medical Biochemistry)/ M.Sc. Medical Biochemistry with Ph.D. Medical (Medical Biochemistry)/ M.Sc. Medical Biochemistry with D.Sc.(Medical Biochemistry) /DNB. | |
| ४ | सुक्ष्मजीवशास्त्र Assistant Professor (Microbiology) | ०३ | M.D. (Bacteriology) /M.D (Microbiology)/ DNB. | |
| ५ | औषधशास्त्र Assistant Professor (Pharmacology) | ०२ | M.D. Pharmacology/DNB. | |
| ६ | न्यायवैद्यकशास्त्र Assistant Professor (Forensic Medicine) | ०३ | M.D. Forensic Medicine/DNB. | |
| ७ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र Assistant Professor (Dermatology and Venereology) | ०१ | M.D.(Dermatology and Venereology)/M.D. (Dermatology, Venereology and Leprosy)/ M.D. (Dermatology) /M.D. (Dermatology including Venereology) M.D. (Dermatology including Venereology/Leprosy)/ MD. (Medicine with D.V.D. or D.D. /DNB | |
| ८ | बधिरीकरणशास्त्र Assistant Professor (Anesthesiology) | ०२ | M.D.(Anaesthesiology) /M.S.(Anaesthesiology)/DNB | |
| ९ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र Assistant Professor (Opthalmology) | ०१ | M.S.(Opthalmology)/M.D.(Opthalmology) /DNB | |
| १० | कम्युनिटी मेडीसीन Assistant Professor Community Medicine (Preventive and Social Medicine) | ०१ | M.D. Social and Preventive Medicine/ M.D.Community Medicine/DNB. | |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | शरीरविकृतीशास्त्र<br>Assistant Professor<br>(Pathology) | ०१ | M.D. Pathology/ Ph.D.Pathology/ D.Sc. Pathology/ DNB | |
| १२ | औषधवैद्यकशास्त्र<br>Assistant Professor<br>(General Medicine) | ०१ | M.D. Medicine/M.D. General Medicine / DNB. | |
| १३ | बालरोगशास्त्र<br>Assistant Professor<br>(Paediatrics) | ०२ | M.D. Paediatrics/DNB | |
| १४ | स्त्रीरोग व प्रसुती<br>**Assistant Professor (Obstetrics and Gynaecology)** | ०१ | M.D. (Obstetrics and Gynaecology)/ M.S. (Obstetrics and Gynaecology) /DNB. | |
| १५ | दंतशास्त्र | ०१ | A Bacheler Degree in Dental Surgery from an indian University with Master in Dental Surgery or Diploma of National Board recognized by the Government of India on the recommendation of Council in the concerned subject. | Experience as a Clinical Assistant Or Dental Surgeon or Senior Resident or Tutor or any equivalent post in any recognized Dental or Medical College for not less than one year, gained after acquire the degree of Bachelor of Dental Surgery or Master of Dental Surgety. |
| | एकुण | ३२ | | |

*** Those candidates who have undergone DNB training in a multi speciality teaching hospital with atleast 500 beds, involved in various postgraduate/super-speciality teaching programmes provided that the one out of three DNB supervisors (teachers) qualify as postgraduate teacher as per MCI norms in his/her previous appointment; and one out of remaining two should qualify as postgraduate teacher as per MCI regulations with the following bed requirement for teaching unit: (As per The Gazette of India - Extraordinary Part-III -Section 4 New Delhi, Thursday, November 1, 2018/Kartika 10, 1940 Dt.31/10/2018)**

दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तक्त्यात नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तद्नंतर रिक्तपद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती:-



Scanned with OKEN Scanner

१) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास सदरहू उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, मंत्रालय, मुंबई-०१, दि.३१ डिसेंबर, २०२० अन्वये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयात तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत सहाय्यक प्राध्यापक (गट-ब) या संवर्गातील अध्यापकांना ठोक मानधन मंजूर केलेले असून, सदर शासन निर्णयान्वये, धुळे या संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक (गट-ब) यांना रु.१,१०,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष दहा हजार मात्र) इतके ठोक मानधन दरमहा मंजूर केलेले आहे. सदरील ठोक मानधन हे संस्थेत मंजूर असलेल्या (१०) कंत्राटी सेवा या उद्दीष्टाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

३) वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही. परंतु जे उमेदवार अगोदर शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवाराच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

४) गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या एमडी/एमएस/एमसीएच/डीएम/किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. संशोधन लेख (शोध निबंध) राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

६) उमेदवार या संस्थे व्यतीरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे? असल्यास केव्हा? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

७) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) उमेदवाराची निवड करतांना ज्या उमेदवारांनी बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला नाही अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

९) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी स्वरुपात राहील. ३६४ दिवसानंतर रिक्तपद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा ३६४ दिवसांसाठी पुर्ननियुक्तीबाबत प्रस्ताव मा.आयुक्त (वै.शि.) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या कार्यालयात सादर करण्यात येईल.

१०) निवड झालेल्या उमेदवारास श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे संस्थेतील कोणत्याही सलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व काम करावे लागेल व प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणतेही रुग्णालयात नेमणूकीत बदल होऊ शकेल. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

११) अर्जासोबत शैक्षणिक अथवा इतर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्र स्विकारले जाणार नाही.

१२) सदर पदावर कार्यरत असतांना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

१३) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१४) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस.डी.एम., एमसी.एच.किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईंट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एम.सी. किंवा एम.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१५) निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्विकारण्यापुर्वी/रुजू होतांना रु.१०,०००/- अनामत रक्कम म्हणून रोखा शाखेत जमा करणे आवश्यक राहील. सदरील रक्कम नियुक्ती कालावधी समाप्त झाल्यानंतर अथवा पदाचा राजीनामा ०१ महिन्याची पुर्व सूचना देणे आवश्यक राहील, अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास अनामत रक्कम सरकार खाती जमा करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१६) सदरील जाहिरात हि, जाहिरात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापासुन एक वर्षापर्यंत ग्राहय ध्रण्यात येईल व आठवडयाचा दर बुधवारी/गुरुवारी संस्थेतील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक रिक्तपदे कंत्राटी (मानधन) तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार भरणेबाबत मुलाखती घेण्यात येतील

(डॉ सयाजी भामरे)
अधिष्ठाता
श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, धुळे

प्रति,

१. सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे
२. सूचना फलक:- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, बाह्य रुग्ण विभाग, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, श्री.भा.हि.शा.वै.म. धुळे.
३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/सलग्न रुग्णालय, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपूर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, गोंदिया, बारामती, नंदुरबार, सिधुदुर्ग, अलिबाग, सातारा, परभणी, जालना, धाराशिव, नाशिक, पालघर, रत्नागीरी, अलिबाग.
४. रोखपाल, रोखपाल शाखा, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी इच्छुक वैद्यकीय अधिकारी या पदासाठीच्या उमेदवारांकडुन (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहीरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

प्रत:-१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.



Scanned with OKEN Scanner

# श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे

## सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्जाचा नमुना

अलीकडिल काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा

प्रति,
मा.अधिष्ठाता, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे.

| | |
|---|---|
| अर्जदाराच्या पदाचे नाव :- | विभागाचे नाव:- |

उमेदवाराचे संपूर्ण नाव :-

कायमचा पत्ता:-

| | | |
|---|---|---|
| भ्रमणध्वनी क्र :- | पॅन क्रं.:- | आधार कार्ड क्र.:- |

| जन्म दिनांक :- | तारीख | महिना | वर्ष | मुलाखतीच्या दिवशीचे वय :- | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| योग्य ठिकाणी अशी √ करावी | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | SBC | OBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

| | (जोडले आहे/नाही) | |
|---|---|---|
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| जन्म (वय) बाबत एसएससी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची सत्यप्रत जोडावी. | होय | नाही |
| अर्जासोबत चालू आर्थिक वर्षाचे दि.३१ मार्च पर्यंतचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| नोकरीत असल्यास तपशिल देवून नियोकत्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम/द्वितीय/तृतीय/ वर्ष एमबीबीएस पास व नापास दोन्ही गुणपत्रिका जोडावीत. | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर परिक्षेचे गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. प्रयत्नांचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.एम.सी.तसेच एम.सी.आय.चे कायम नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| एम.एम..सी. प्रमाणपत्र चालू वर्षात वैध (रिन्युयल) केलेले असावे. | होय | नाही |
| अर्जदार हा बंधपत्रित आहे काय ?. | होय | नाही |
| असल्यास बंधपत्रित कालावधीचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| बंधपत्रित असल्यास सेवा कालावधी व शिल्लक सेवा कालावधी बाबत प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण केलेली परिक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न महाविद्यालयाची नाव | शासकीय /अशासकीय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष एमबीबीएस | | | | | |
| २. | एमडी/एमएस | | | | | |
| ३. | इतर | | | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांकासह :-

अटी व शर्ती :-

१) अर्जातील पदावरील अनुभव व अनुभव प्रमाणपत्र (नियुक्ती आदेश व रुजू अहवाल) नसल्यास अर्ज बाद होईल.
२) सदरील अर्जातील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता एमसीआय/एनएमसी च्या मानकाप्रमाणे असावी.
३) सर्व कागदपत्रे फार्ममधील अनुक्रमानुसार लावणे गरजेचे असेल.
४) सादर केलेले सर्व प्रमाणपत्र व कागदपत्रावर स्व:ताची स्वाक्षरी करुन साक्षांकित करणे आवश्यक.
५) अर्ज पूर्ण वाचुन अर्ज पूर्ण भरावा. अपूर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही.
६) कागदपत्रात त्रृटी आढळल्यास अर्ज बाद करण्यात येईल.

(मागील पानावर)

Scanned with OKEN Scanner

६) कागदपत्रात त्रृटी आढळल्यास अर्ज बाद करण्यात येईल.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम-२००५ मधील नमुना-अ (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कु.डॉ. ______________________________ श्री ________________
________________________ यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय:- वर्ष, राहणार ____________

यापुढे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की, १. मी ________________________________ या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. २. आज मला _________ (संख्या) इतके मुले हयात आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च, २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _________ इतकी आहे. ३. यात असलेल्या मुलांची संख्या दोन (०२) पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

वर नमूद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल, आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांकासह :-

प्राध्यापक व विभागप्रमुख यांची स्वाक्षरी (संमती/असंमती)

टिप:- अर्जदाराने अर्जासोबत छायांकित सत्य प्रती जोडलेल्या असाव्यात. अर्जदाराने प्रत्येक पदासाठी / विषयासाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

अर्ज तपासणी व गुणांकण समिती :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
| सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

अधिष्ठाता

श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे

Scanned with OKEN Scanner